# मुलींच्या शिक्षणाचे 'क्रांतीवीर'



## ज्ञानगंगेतील कर्तबगार

गुरुबाळ माळी

मुलींच्या शिक्षणाची आबाळ थांबविण्याबरोबरच त्यांना मुक्तपणे फुलू द्यावे म्हणून व्ही. टी. पाटील यांनी खास मुलींसाठी ताराराणी विद्यापीठाची स्थापना केली. त्यांचे स्वप्न सत्यातही उतरले. या विद्यापीठाच्या सर्व शाखा आज 'हाऊसफुल्ल' चालत आहेत. त्याचे बरेच श्रेय जाते ते कमला कॉलेजचे प्राचार्य क्रांतीकुमार पाटील यांना. सचिव म्हणून सूत्रे हाती घेतल्यापासून विद्यापीठात नवनवीन कल्पना राबविताना मुलींच्या व्यक्तिमत्त्वात अमूलाग्र बदल घडवताना त्यांनी क्रांतीच केली आहे.

प्राचार्य क्रांतीकुमार पाटील यांचे वडील रंगराव पाटील हे स्वातंत्र्यसैनिक. क्रांतीसिंह नाना पाटील, वसंतदादा पाटील, नागनाथआण्णा नायकवडी यांच्या समवेत त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतली. त्यामुळे घरात राजकीय आणि सामाजिक वातावरण नेहमीच तापलेलं. अशा वातावरणातच सरांचे सांगली जिल्ह्यातील शिरगाव या गावातच प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण झाले. त्यानंतर कोल्हापुरातील राजाराम कॉलेज आणि पुणे विद्यापीठात पदवी आणि पदव्युतर शिक्षण पूर्ण केले. यावेळी त्यांनी दक्षिण फेलोशिपही मिळवली.

बालपणापासूनच सरांच्यात नेतृत्व करण्याची चुणूक होती. घरातील वातावरणही त्याला पोषक होते. त्यामुळे शाळा असो वा कॉलेज वर्गाचे नेतृत्व त्यांच्याकडेच असायचे. त्यांच्या वडिलांचे रयत शिक्षण संस्थेशी जवळचे संबंध. त्यामुळे पदव्युतर शिक्षण पूर्ण होताच १९७१ साली सर या संस्थेच्या कराड येथील कॉलेजमध्ये समाजशास्त्राचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. नंतर त्यांची बदली कोल्हापुरातील शाहू कॉलेजमध्ये झाली. प्राध्यापक म्हणून काम करतानाही त्यांच्यातील नेतृत्वगुण चमकलेच. कोल्हापूर जिल्हा प्राध्यापक संघटनेचे सचिव म्हणून त्यांनी काम केले. विद्यापीठाच्या सिनेटवरही ते निवडून आले. याच काळात त्यांनी पीएच.डी.ही मिळवली. ज्यासाठी त्यांनी सांगली जिल्ह्यातील पंचायत राजचा सखोल अभ्यास केला.

ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक व्ही. टी. पाटील (काकाजी) हे त्यांचे आजोबा. त्यांनी सरांच्यातील नेतृत्वगुण हेरले आणि आपल्या संस्थेत सहसचिव म्हणून नेतृत्व करण्याची संधी दिली. १९७९ पासून सर ताराराणी विद्यापीठात रुजू झाले. छत्रपती ताराराणींचा त्रिशताब्दी जन्ममहोत्सव, काकाजींची ८० वा वाढदिवसाचा सत्कार समारंभ आणि संस्थेचा इतिहास लिहून सरांनी संधीचं सोनं केलं.

स्वातंत्र्यानंतरही मुलींच्या शिक्षणाची आबाळ थांबली नव्हती. त्यामुळे शिक्षणात मुलींची संख्या फारच कमी होती. ही परिस्थिती पाहून काकाजींनी खास मुलीसाठी शाळा-कॉलेज सुरू करण्याचे ठरवले. मुलींच्या व्यक्तिमत्वाला वाव देण्यासाठी त्यांनी १९८२ ला कॉलेज सुरू केले. वसंतदादा पाटील यांनी हे कॉलेज अनुदानित केले आणि कॉलेजची भरारी सुरू झाली. मुलींना मोफत शिक्षण, प्रत्येक तालुक्यात त्यांच्यासाठी वसतिगृह आणि मुलींसाठी असलेले कॉलेज अनुदानित करण्याचे क्रांतीकारक निर्णय वसंतदादांनी घेतले. ते केवळ कमला कॉलेजमुळेच.

प्राध्यापक म्हणून यशस्वी झालेल्या सरांनी प्रशासक म्हणून कमला कॉलेजमध्येच सुरूवात केली. आणि त्यांच्या जीवनाला वेगळीच कलाटणी मिळाली. कोल्हापूरच्या आसपास ग्रामीण भागातील मुलींनी विश्वासार्ह शिक्षण संस्था म्हणून या संस्थेला पहिली पसंती दिली आहे, त्यामागे पाटील सरांनी राबवलेले उपक्रमच आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरांना केवळ कमला कॉलेजमधील विद्यार्थिनी निवासी शिबिराचा लाभ घेऊ शकतात.

मुलींच्या सुप्त गुणांना वाव देणारे भित्तीचित्र, गुंजारव, फेस्टिवल, स्पर्धा अशी सर्जनशील व्यासपीठं देण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या पाटील सरांनी महाविद्यालयाला शिस्तीची किनारही दिली आहे. आवारातच वसतिगृह असल्यामुळे मुलींच्या सुरक्षिततेची जबाबदारी या शिस्तबद्ध नियमावलीच्या माध्यमातूनच पेलली जाते. महाविद्यालयाद्वारे विविध शिष्यवृत्तींची मदत देण्यासाठी प्रशासनाचे प्राधान्य आहे. गोवा, दिल्ली अशा विविध ठिकाणी झालेल्या कार्यशाळेत सहभागी होऊन त्यांनी गुणवत्तेशी नाळ जोडताना विद्यापीठाच्या सिनेट, व्यवस्थापन कमिटी अशा विविध अधिकार मंडळावर काम करताना शैक्षणिक आणि प्रशासकीय या दोन्ही क्षेत्रातील आपली कर्तबगारी दाखवून दिली. संघटनात्मक कार्यातही ते सतत अग्रेसर असतात. शिवाजी विद्यापीठातील सर्व प्राचार्यांची संघटना त्यांनी बांधली. कोल्हापूर जिल्हा प्राचार्य संघटनेचे अध्यक्ष आणि विद्यापीठ प्राचार्य संघटनेचे जनरल सेक्रेटरी म्हणून ते कार्यरत राहिले. या काळातही प्राचार्यांच्या अनेक मागण्या त्यांनी आपल्या कौशल्याने शासनाकडून मान्य करून घेतल्या. विकास निधी वाढवण्यापासून ते विद्यापीठ कायद्यात बदल करण्यापर्यंत अनेक लढ्यांचे यशस्वी नेतृत्व त्यांनी केले.

केवळ मुलींचे कॉलेज असल्याने अनेक अडचणी येतात. या अडचणींना खंबीरपणे सामोरे जात सरांनी कॉलेजचा चेहरामोहरा बदलला आहे. फॅशनपासून ते फूड टेक्नॉलॉजीपर्यंत विविध व्यावसायिक कोर्सेस सुरू करतानाच त्यांनी खेळालाही प्राधान्य दिले. त्यामुळे या कॉलेजच्या विद्यार्थिनी जशा बोर्ड आणि विद्यापीठाच्या परीक्षेत गुणवत्ता यादीत चमकतात, त्याचप्रमाणे खेळातही राष्ट्रीय पातळीवर चमकत आहेत. आर्थिक परिस्थिती आणि विवाह यामुळे अनेक मुलींचे शिक्षण मध्येच थांबते. अशा मुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी कॉलेजमध्ये मुक्त विद्यापीठाचे केंद्र सुरू केले. मुलींच्या राहण्याची व्यवस्था व्हावी म्हणून वसतिगृह बांधले.

बालवाडीपासून ते पदवीपर्यंत शिक्षणाची सोय सध्या या विद्यापीठात आहे. आता पदव्युतर शिक्षणाची सोय करण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे. याबरोबरच हॉस्पिटल मॅनेजमेंट, योगा स्टडीज अशा प्रकारच्या व्यावसायिक कोर्सेसबरोबरच होम सायन्सचे पदव्युतर शिक्षण सुरू करण्याचा त्यांचा मानस आहे. मुलींना सर्व क्षेत्रात प्रोत्साहन मिळावे, म्हणून त्यांची धडपड सुरू असते. शिस्त आणि गोंधळाचे कारण पुढे करून सर्व महाविद्यालयांनी गॅदरिंग बंद केले. कमला कॉलेजमध्ये मात्र ते आजही सुरू आहे.

याचबरोबर अनेक सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांशीही सरांचा निकटचा संबंध आहे. ताराराणी विद्यापीठाचे सचिव म्हणून कार्यरत असताना त्यांनी कॉलेजबरोबर संस्थेचाही चेहरामोहरा बदलला. कॉलेज, वसतिगृह, ग्रंथालयाच्या जंगी इमारती उभारतानाच विविध उपक्रमांतून मुलींचे व्यक्तिमत्व विकसित केले. त्यांच्या या कार्याचा कोल्हापूर महानगरपालिकेने 'कोल्हापूर भूषण' पुरस्कार देऊन गौरवही केला आहे.